म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८४३
१९८५

# ...रचा वारा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. २९२ | विभाग काव्य | क्रमांक ३
पुस्तकाचें नांव बाहेरच्या वारा
लेखक भोरोले
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका. पुस्तकाची खराबी करूं नका.
REFBK-0006663
REFBK-0006663

मास्तराचें रडगाणें ...
आवडती आणि नावडती
वाटेवर ... ... ...
कृष्णार्जुनयुद्ध ... ...
इकडची स्वारी ... ...
वधूपरीक्षा ... ... ...
चटकचांदण्या ... ...

# बाहेरचा वारा

कवि

शंकर दत्तात्रय भोंसले

[ 'गालावरचे गुलाब' या काव्यसंग्रहाचे कर्ते ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६६३
REFBK-0006663
REFBK-0006663

प्रकाशक

महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४.

## वारा लागण्यापूर्वी—

काव्यसंग्रहाचें 'बाहेरचा वारा' हें नांव वाचून वाचकांनीं बिचकून जाण्याचें कारण नाहीं. शुद्ध आणि उत्साहवर्धक मोकळा वारा असा त्याचा अर्थ घ्यावा.

—शं. द. भोंसले

प्रथमावृत्ति १९४५

( सर्व हक्क कवीच्या स्वाधीन )

किंमत १२ आणे

प्रकाशक--शंकर वामन कुळकर्णी, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई ४
मुद्रक--शं. वा. कुळकर्णी, सागर साहित्य छापखाना, त्रिभुवन रोड, मुंबई ४

६६६३
क्र. क्र.

# बाहेरचा वारा

## घातकी प्रियकरास

( चाल–पंछी काहे होत उदास )

कैसी राहूं मी जगतांत ?
नाहीं सुख माझ्या नशिबांत ॥ ध्रु० ॥
बांधियले मी उंच मनोरे
सुबक, टिकाऊ आणि साजिरे
भूकंपानें परि ते सारे
कोसळले निमिषांत
हृदयामाजी बीज पेरिलें
रोप वाढलें अन् मोहरलें
फळें चाखणें नशिबीं कुठलें
झाला विद्युत्पात
रम्य सरोवर दिसलें भारी
म्हणुनी गेलें मी सामोरी

परी निराशा झाली सारी
पाहुनि मृगजळ त्यांत
शोक कशाला गत गोष्टींचा
बोल ऐक आतां शेवटचा
करूं नको कुठल्या अबलेचा
पुनरपि ऐसा घात

—:०:—

# जवानिचें विमान

(जाति- भूपतिवैभव)

भर जवानिचें गे, विमान सखये, सजवूं
दिव्य रूप त्याला देउनि जगतां दिपवूं
लज्जेचा त्याला नाजुक पंखा लावूं
गालिंचा गुलाबी रंग तयाला देऊं
अन् दिवे अंतरंगाचे त्याला लावूं
गति नयनांतिल बाणाची त्याला देऊं
बैसुनी त्यामधें प्रीतीनगरा जाऊं
करुं विहार तेथें, सुंदर गाणीं गाऊं

—:×:—

६६-६३
(स्थळ प्रत)

# अडदांडपुरचे इनामदार

( जाति-रसना )

अडदांडपूरचे ते मोठे इनामदार
अडगेपणामधेंही होते प्रसिद्ध फार
चालें जगांत काय चाले घरांत काय
नच पाहणें कधींही जणुं हेंच एक ध्येय
तारीख, वार, माहे सन कोणता न ठावे
खाऊनि अन् पिऊनी चैनीमधें रहावें
शिमग्यास एक आला कुणि पाहुणा घराला
मग अर्थहीन ऐशा गप्पांस ऊत आला
इतुक्यांत पाहुण्यानें मध्येंच प्रश्न केला
"सांगा इनामदार पोरें कितीं तुम्हांला?"
वदले इनामदार कर लावुनी शिराला
"मग सांगतों तुम्हांला पुसुनी दिवाणजीला"

—:०:—

# पांथास

( चाल-दोन घडीचा डाव )

तुझें कोणतें गांव ? पांथा, सांग आपुलें नांव ॥ ध्रु० ॥

फिरसी माझ्या सदनाभंवतीं
आणि चोरुनी बघसी वरती
असशि चोर वा साव ?

पुरुष आजवर कैक पाहिले
तुला पहातां परी उसळले
मनिंचे माझ्या भाव

जीवन हें रमणीय सरोवर
हाकारूं त्यामाजी सरसर
अनुरागाची नाव

मोहक वारा तारुण्याचा
खेळूं ये आपण प्रणयाचा
अवीट ऐसा डाव

सौख्य नगरचा मार्ग सुधारूं
शृंगाराचा अबलख वारू
सोडुनिया भरधांव

संसाराचा अफाट सागर

त्यांत संकटें असंख्य खडतर

त्यांचा करूं पाडाव

ऐस कोणही आणि कसाही

तुझीच झाली अतां तनू ही

नसे दुज्याला वाव

अपूर्व ठरवूं अपुलें मीलन

ऐसें कीं, राहवी चिरंतन

कीर्ती गांवोगांव

—:०:—

# मनीषा

( जाति–सूर्यकांत )

एके दिवशीं सहज पाहिली तुजला मार्गावरी
हृदयामाजी क्षणांत उठली इष्काची शिरशिरी
सौंदर्याचा अर्क काढुनी जणूं बनविली तुला
जनानखान्यांतुनि इंद्राच्या आलिस जणुं भूतला
रेखिव बांधा, रूप मनोहर, कांती तव उज्ज्वल
चित्र काढितां तुझें चितारी गोंधळून जाइल
शर नयनांचे सोडिलेस तूं मजवरती जेधवां
जखम जाहली खोल, तिच्यावर हवा प्रीतिचा दवा
जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं तुझीच मूर्ती दिसे
सांगूं तुजला कसें ! खरोखर लाविलेस मज पिसें
व्हावी प्राप्ती तुझी मनीषा हीच एक अंतरीं
मुशाफीर होउनी नातरी जाइन कोठेंतरी

—:०:—

आंक १२९९

रंगीबेरंगी वसनांचें भरलें संमेलन
उषा जणु आली क्षितिजांतुन
शोभादायक झाडाखालीं बसलों मी ऐटींत
आळवित प्रातीचें संगित
इतुक्यामध्यें सन्निध आली बाला कोणीतरी
खनी ती लावण्याची खरी
लगट करूनी मला म्हणाली "नाथ, सख्या, प्रियकरा
मला द्या प्रेमाचा आसरा"
टाळी ब्रम्हानंदिं लागली, जाय भान हरपुनी
प्रणयमय वादळ उठलें मनीं
हळुवारपणानें जवळ तिला ओढिली
हळुवारपणानें तिजला आलिंगिली
हळुवारपणानें तिजला मी चुंबिली
जागा झालों आणि पाहिला निराळाच मासला
उशाचा कंदिल मी चुंबिला

—:x:—

# स्वप्नांतील चुंबन

(जाति–केशव करणी)

गांवाबाहिर तलाव मोठा, शुभ्र तयाचें जळ
आरसा सृष्टीचा निर्मळ
फळाफुलांचीं नयनमनोहर सभोंवार उपवनें
सृष्टिची मौल्यवान भूषणें
प्रेमनगरचे जे रहिवासी, प्रिय त्यांना हें स्थळ
तयांचा पडतो येथें तळ
शृंगाराचा मादक वारा मंजुळ गायन करी
वाजते प्रीतीची बांसरी
यौवनधारी सुंदर नारी, प्रेमवीरही तसे
प्रीतिचें ज्यांना जडलें पिसें
रस प्रणयाचा प्राशन करुनी रंगढंग मांडिती
देखुनी कुंठित होते मती
पण मौज मात्र एकदां अशी जाहली
स्वप्नांत फिराया गेलों मी या स्थळीं
अन् रमलों पुरता, खुलली माझी कळी
नवयुवतींच्या येउं लागल्या रांगा रांगावरी
ज्यापरी पर्जन्याच्या सरी

ग्रं. १२९१

रंगीबेरंगी वसनांचें भरलें संमेलन
उषा जणु आली क्षितिजांतुन
शोभादायक झाडाखालीं बसलों मी ऐटींत
आळवित प्रातीचें संगित
इतुक्यामध्यें सन्निध आली बाला कोणीतरी
खनी ती लावण्याची खरी
लगट करूनी मला म्हणाली "नाथ, सख्या, प्रियकरा
मला द्या प्रेमाचा आसरा"
टाळी ब्रम्हांनंदिं लागली, जाय भान हरपुनी
प्रणयमय वादळ उठलें मनीं
हळुवारपणानें जवळ तिला ओढिली
हळुवारपणानें तिजला आलिंगिली
हळुवारपणानें तिजला मी चुंबिली
जागा झालों आणि पाहिला निराळाच मासला
उशाचा कंदिल मी चुंबिला

—:x:—

# स्वप्नांतील चुंबन

(जाति-केशव करणी)

गांवाबाहिर  तलाव मोठा, शुभ्र तयाचें जळ
आरसा सृष्टीचा निर्मळ
फळाफुलांचीं नयनमनोहर सभोंवार उपवनें
सृष्टिची मौल्यवान भूषणें
प्रेमनगरचे जे रहिवासी, प्रिय त्यांना हें स्थळ
तयांचा पडतो येथें तळ
शृंगाराचा मादक वारा मंजुळ गायन करी
वाजते प्रीतीची बांसरी
यौवनधारी सुंदर नारी, प्रेमवीरही तसे
प्रीतिचें ज्यांना जडलें पिसें
रस प्रणयाचा प्राशन करुनी रंगढंग मांडिती
देखुनी कुंठित होते मती
पण मौज मात्र एकदां अशी जाहली
स्वप्नांत फिराया गेलों मी या स्थळीं
अन् रमलों पुरता, खुलली माझी कळी
नवयुवतींच्या येउं लागल्या रांगा रांगावरी
ज्यापरी पर्जन्याच्या सरी

# नवा मनु

( जाति–रसना )

होऊं नये जहाली विपरीत गोष्ट फार
तूं भेटलीस मजला सुख जाहलें पसार
पति मी तुझा परंतू तुजला गुलाम वाटे
गणितेस काय गे, तूं पाळीव श्वान मातें
पट्टा तुझ्या मुखाचा भरधांव नित्य चाले
रट्टा तुझ्या कराचा खाणें असह्य झालें
दररोज येथ यावें तव मित्र मैत्रिणींनीं
त्यांना गड्यापरी मी द्यावा चहा करूनी
हा न्याय कोठुनीया आला नव्या मनूत
साम्राज्य कीं स्त्रियांचें झालें अतां जगांत
जासी फिरावयाला दावीत थाटमाट
करडा हुकूम करुनी मज बैसण्या घरांत
करितेस वेशभूषा राणीस शोभणारी
माझी पहा अवस्था वाटे बरा भिकारी
माझें नसे कुणीही सगळे तुझेच भाट
तुजलाच मान मोठा सगळा तुझाच थाट

मम दुःख याप्रमाणें
जरि सारखें दुणावें
मन शांत ठेवुनीया
होईल तें पहावें
दिन संपतील हेही
तूं मात्र ठेव ध्यानीं
येतांच वेळ माझी
घेईन मी बघूनी

—:XX:—

# सकच्छ आणि विकच्छ

( गोल नेसणाऱ्या स्त्रियांची क्षमा मागून )

( जाति–चंद्रकांत )

सकच्छ वाटे रेखिव आणि आकर्षक फार
विकच्छ वाटे जणूं कडी अन् कुलुपाविण दार
सकच्छ वाटे जणूं लाविला पडदा किनखापी
विकच्छ वाटे जणूं लाविली चिलमीला छापी
सकच्छ वाटे जणूं फडकतें निशाण राष्ट्राचें
विकच्छ वाटे जणूं ताणलें कापड तंबूचें
सकच्छ वाटे जणूं चमकते तलवारच नंगी
विकच्छ वाटे जणुं मल्लानें लावियली लुंगी
सकच्छ वाटे ताज साजिरा जणुं हा आग्र्याचा
विकच्छ वाटे ओबडधोबड बुरूज किल्ल्याचा
सकच्छ वाटे काश्मीरांतिल शालिमार बाग
विकच्छ वाटे कच्छमाधिल जणुं वाळूचा भाग
सकच्छ वाटे जणूं पिसारा मयूर पक्ष्याचा
विकच्छ वाटे जणूं पिंजरा असे पोपटाचा
विकच्छ ठरतें मात्र चांगलें बाबतींत एका
सहासात वारांत झांकतें अंग, बचे पैका

—:x:—

# मास्तराचें रडगाणें

(छंद–ओवी)

ऐका ऐका हो समस्त जन
चित्त ताळ्यावर ठेवुन
जाल सगळे गहिंवरुन
ऐकून माझें रडगाणें

मीच बरे तो मास्तर
सदैव ज्याची उडते टर
ज्याला नाहीं काडीभर
जगामाजी किंमत

काम पर्वताएवढें
पगार नाहीं तिसाच्या पुढें
मात्र अधिकाऱ्यांचे जोडे
भरपूर मिळती खावया

माझ्या शिष्यांपैकीं कैक
झाले आतां बडे लोक
मीच मात्र कफल्लक
कींव येते माझी मला

पक्ष्यांमाजी दिवाभीत
गर्दभ चतुष्पादांत
तैसा मानवप्राण्यांत
तुच्छ बिचारा मास्तर

आर्थिक स्थितींत नाहीं अर्थ
कशाला पडायचें संसारांत
बरें हें ब्रम्हचर्यव्रत
दगडापेक्षां वीट मऊ
परंतु काय हे लोक तरी
म्हणती "हा कशाचा ब्रम्हचारी
असेल याचें कोणतरीं
माणूस प्रेमाचे"
विद्यार्थी आणि विद्यार्थिनी
अभ्यासावर सोडून पाणी
फिरती एकमेकांमागुनी
सूत जमविण्यासाठीं
आणि नापास झाल्यावर
फोडिती मास्तरावर खापर
म्हणतीं "शिकवीत नाहीं बरोबर
मास्तर आमुचा"
खोट्यानें जिंकला दावा
खऱ्याला मिळाली तुरुंगाची हवा
न्यायनीती जगीं केधवां
येणार परत आतां

—:×:—

# आवडती आणि नावडती

(जाति रसना)

(आवडती आणि नावडती यांच्यांतला फरक पतिराज नावडतीला सांगतात)

| | |
|---|---|
| कोठें तिलोत्तमा ती | अन् तूं कुठें हिडिंबा |
| तिज पाहतांच "ओहो" | तुज पाहतांच "तोबा" |
| ती बांसरी सुरेल | करणा तुझा भसाडा |
| टुमदारशी बगी ती | अन् तूं खटारगाडा |
| भूमी तिची पिकाऊ | फोंडा त्वदीय माळ |
| गादीच ती परांची | तादूक तूं गचाळ |
| शालू बनारसी ती | तूं इरकली सुताडा |
| सरिताच ती पवित्र | अन् तूं गढूळ ओढा |
| सुमराज ती गुलाब | तूं फूल धोतऱ्याचें |
| ती पात्र कांचनाचें | टिनपॉट तूं फुकाचें |
| राणी खरीखुरी ती | अन् इस्पिटांतली तूं |
| ती साजिरी मराठी | खडकाळ कानडी तूं |
| ब्लाऊझ रेशमी ती | चोळी तुझी चिटाची |
| देवीच शारदा ती | तूं चंडिकाच साची |
| ऋतुराज ती वसंत | तूं ग्रीष्म तापदायी |
| ती रामराज्य नामी | अन् तूं निजामशाही |

पेढाच केशरी ती नकली त्वदीय भेळ
ती राजमार्ग मोठा तूं बांकदार बोळ
व्यवहार रोखिचा ती आणी तुझा उधार
शँपेन ती विलासी तूं बेवडा भिकार
रेखीव ती हवेली तूं झोपडी भकास
ती गोड गेय रीती तूं गायकी हिडीस
ती रम्य चांदरात अन् रात्र काजळी तूं
ती खास शुक्रतारा तूं खास धूमकेतू

—××—

# वाटेवर

(चाल–रुतला ग सखे पायाला दर्भांकुर)

(एक सुंदर तरुणी आपल्या मैत्रिणीला सांगते)

बसतात कुणीतरी माझ्या वाटेवर ॥ ध्रु०॥
जागोजागीं त्यांचीं ठाणीं
पोलीस राहती जैसे नाक्यांवर

पाहुनि मज टाकिती उसासे
स्वर्गीय समाधानाचे वरचेवर

हंसुनी डोळे कुणी मिचकतो
अन् ताठ करी सदऱ्याची कुणि कॉलर

लहर खोकण्याचीच कुणाला
कर घड्याळयुक्त कुणाचा भांगावर

शीळ घालतो कुणी हळुहळू
कुणि प्रीतीगीतच गाई तालावर

रान जिवाचें करिति बापुडे
इंप्रेशन मारायाला माझ्यावर

—xx—

# कृष्णार्जुनयुद्ध

(छंद–ओवी)

कृष्ण म्हणे "रे अर्जुना
माझी कल्पना तूं शहाणा
परंतु अगदीं बेदाणा
दिसतोस तूं
तुझा बाहेरख्याली बाणा
पसंत पडणार नाहीं कुणा
व्यर्थ कलंक जीवना
घेतोस लावुनी
आज हिच्याशीं उद्यां तिच्याशीं
प्रीतीचा लपंडाव खेळसी
तुझ्यासारख्या वीरासी
हें शोभतें काय ?"
अर्जुन म्हणे "रे कृष्णा
पुरे तुझा दांभिकपणा
तुला बोलावया तोंड ना
लक्षांत ठेव
सोळा सहस्र एकशें आठ
भोगून नारी भरमसाट
सज्जनपणाचा उलट
आव आणिसी"

कृष्ण म्हणे "रे अर्जुना
किती करशील उद्धटपणा
लाज तुला मनाची ना
ठेव जनाची तरी
सांगतों अनुभवानें तुजप्रती
मौज नाहीं करण्यांत अती
थोड्यांत गोडी, अती तेथें माती
हें तुज कैसें नकळे ?"

अर्जुन म्हणे "रे चक्रपाणी
तुझ्यांतलें संपलें पाणी
म्हणूनिया ऐसी वाणी
काढतोस तूं
करूनी करूनी भागला
देवपूजेला लागला
त्यांतलाच तुझा मामला
बा द्वारकाधीशा"

कृष्ण म्हणे "रे पार्था
तूं सदैव उठतां बसतां
खाणार सकलांच्या लाथा
संदेह नाहीं
पाजणें बोधामृत तुजप्रती
पाणी पालथ्या घड्यावरती



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्रा. क्र. ६५९३

किंवा गर्दभावरी पुष्पवृष्टी
करण्यापैकींच प्रकार"
अर्जुन म्हणे "रे रुक्मिणीवरा
सत्यभामेच्या प्रियकरा
मी काय सांगतों तें जरा
ऐक कान देउनी
आतां उपदेश तुझा बस झाला
अरे मी ओळखून आहे तुला
कोल्हा शेपूट तुटलेला
आहेस तूं
शेवटीं निक्षून सांगतों तुला
नको लागूं माझ्या नादाला
हा अर्जुन तुझ्या बापाला
फसणार नाही"

—:x:—

# इकडची स्वारी

( चाल–उसळत तेज भरें गगनांत )

विपरित स्वारि इकडची फार ॥ ध्रु० ॥

अवगुण यांचे सांगायाला
दिन नाहीं पुरणार
नच राजी करण्यास नोकरी
म्हणति बसुन खाणार
सहनशक्तिची हद्द संपली
जिव झाला बेजार
नको नकोसा वाटे मजला
असार हा संसार
बोल प्रीतिचे नशिबीं कुठले
सदा शिव्यांचा मार
खाण्याच्या बाबींत न जाती
बकासुराला हार
प्रणयाचें तर नका विचारूं
घसमुसळे अनिवार
सदैव मानेवरी लटकते
गरिबीची तरवार

वाटें जावें दूर कुठेंही
सोडुनिया घरदार
मात्र एक भरपूर नशीबीं
पोरांचें लेंढार

—:०:—

# वधूपरीक्षा

(जाति-चंद्रकांत)

लग्नसराई चालू झाली धूमधडाक्यानें
जिकडे तिकडे उभे राहिले मांडव थाटानें
बघुनि सर्व हें होऊं लागलें कसेसेंच मजला
येऊं लागला अन् मदनाचा कांटा अंगाला
मनीं म्हणालों "ब्रम्हचर्य हें कामाचें नाहीं
लग्नावीना जीवित म्हणजे शून्य दिशा दाही"
विचार करुनी प्रसिद्ध ऐशा दैनिक पत्रांत
'वधू पाहिजे' अशी ठराविक दिली जाहिरात
जवळच्याच गांवाहुन आलें पत्र मला एक
'मुलगी बघण्याकरितां यावें आपण उदईक'
दुसऱ्या दिवशीं वधू पहाया अस्मादिक गेले
वहिवाटीला धरून तेथें स्वागत मम झालें
लचकत, मुरडत, ठुमकत आली पुढती ती बाला
जरतारी पदराचा बुरखा घालुनि मुखड्याला
पदर सरकला आणि भ्रमाचा भोपळाहि फुटला
वधू कशाची ? वानरीच ती ! धक्का मज बसला

भोंवतालचे फिरूं लागलें, भोंवळ मज आली
तनु थरथरली, जणूं हुडहुडी थंडीची भरली
मुठींत धरुनी जीव शेवटीं कसाबसा उठलों
"कळविन नंतर" बोलुनि ऐसें परत घरा आलों

—:×:—

# चटकचांदण्या

( जाति—मंजरी )

रोज रोज जासी कां या रस्त्यांतुन
मी नियमानें तुज बघतें खिडकींतुन
येतांच इथें कां हळूच बघसी वरी
चढ विचार करुनी प्रीतीची पायरी
तो मधुप जाइ सुम एक एक सेवुनी
असशील कदांचित् तसाच तूंही कुणी

—:०:—

जाहलें खरोखर आषक मी तुजवर
धांवतें सारखें तुझ्याकडे अंतर
पण कळे न मजला काय तुझ्या मानसीं
स्त्रीजात लाजरी, वदूं मनीषा कशी ?
दाखीव जरासा प्रीतीचा अंकुर
बनवीन तयाचा वृक्ष सख्या, सत्वर

—:०:—

तुज पुन्हा पुन्हा सांगतों तरि न ऐकसी
कां उगीच माझ्या नादाला लागसी?
तूं श्रीमंताची रूपवान कन्यका
मी दीनबापुडा तुझियापुढती फिका
ठरणार खास तुज पती कुणी लखपती
ओवाळ तयाला घेउन पंचारती

—:०:—

मज बघतां करिसी हालचाल गोडशी
मिष्कीलपणें तूं वरचेवर पाहसी
यावरुन काय मी निश्चित समजायचें
किति दिवस अतां हें असेंच चालायचें
चल बोल सुंदरी तुझी मनीषा झणीं
या क्षणींच टाकूं प्रीतबाग फुलवुनी

—:०—

या इथेंच बसलों तूं अन् मी बोलत
या इथेंच होतों तूं अन् मी खेळत
तूं म्हणालीस मज "नाथ सख्या प्रियकरा"
अन् मीहि म्हणालों "तूं माझी अप्सरा"
या इथेंच दिसतें आज काय मजप्रती ?
तूं घेउन येसी निराळाच सोबती

—:०:—

वय हिचें वाटतें सतरा वा आठरा
अंगांत विकसला जवानिचा मोगरा
सौंदर्य खुलें चौफेर शरीरावरी
ही फिरे प्रीतिच्या दुर्गम वाटेवरी
लाभला न हिजला वाटाड्या जर कुणी
ही भकेल कोठेंतरी मार्ग सोडुनी

—:०:—

नेसलीस साधें शुभ्रवर्ण अंबर
ना डौल दागिन्यांचा तुझिया तनुवर
तरि मोह पाडितें रूप तुझें देखणें
तीं नकोत तुजला नटायचीं साधनें
तुज बघुनि सुभाषित आठवतें गोड तें
'जातिच्या सुंदरा कांहींही शोभतें'

—:०:—

मजवरी प्रेम ना तुझें जरी हें खरें
तुजसाठीं माझा जीव सारखा झुरे
लागला कुणाचा नाद तुला बोलना
कोणती बैसली हृदयीं तव अंगना !
जा खुशाल तिचियासवें प्रेममंदिरीं
देत जा मात्र मज दर्शन केव्हांतरी

—:०:—

ती पहा निघाली नटुनी थटुनी पुढें
नारिचें किती तालावर पाउल पडें
लचकते, मुरडते सुरेख वरचेवरी
म्हणतात नर्तकी आहे कोणीतरी
महिन्यांत एकदां नाच हिचा व्हायचा
परि चाले नंगा नाच हिचा रोजचा

—:०:—

तोंडाळ निघाली पहिली माझी वधू
अन दुजी घरी नित मौन, मुखानें अधू
बायका जहाल्या पांच, एक ना धड
व्यांगानें ठरल्या एक एक वरचढ
ये विचार मग 'काढावी खाणावळ
कीं स्थापावें सदनीं महिलामंडळ !'

—:०:—

वाटेंत भेटली वयांतली छोकरी
आकर्षक भारी जरी सावळी तरी
जातांना जवळुन स्पर्श जाहला जरा
त्यापुढें तुच्छ मज वाळवंटिंचा झरा
क्षण एक येउनी विचार गेला मनीं
'जावें का थोडा वेळ हिच्या मागुनी ?'

—:०:—

रागांत बोलली नवऱ्याला फारच
जेवली न, आणी निजलीही दूरच
थंडगार सुटली उषःकालची हवा
लागली सराया जवळ जवळ तेधवां
तो हळूच बोले तिला "अतां कां असें ?"
ती म्हणे "वदाया सवड अतां मज नसे"

—:०—

"पोरगी करी कसकसें कालपासुनी
वरचेवर येते अंगावर धावुनी"
"होय का ? बरें वय तिचें कितीं जाहलें ?"
"शिमग्याला तिजला सोळावें लागलें"
"मग नका करूं अनमान, आटपा झणीं
द्या मुहुर्तास पहिल्याच लग्न लावुनी"

—:०:—

वाचला उमरखय्याम चित्त लावुनी
तत्व एक नामी असे रुबायांतुनी
'प्या सुरा, भोग घ्या मदिराक्षीचा पुरा
होण्यास सुखी भूवरी मार्ग हा खरा'
वाचुनी जाहलों उतावीळ मी मनीं
पण पेंच पडे 'हें मिळायचें कोठुनी ?'

—:०:—

त्या होत्या बहिणी तीन, तिघी सुंदर
पण राग तयांचा होता पुरुषांवर
"हे पुरुष दुष्ट" त्या बोलत वरचेवरी
लागला प्रीतिचा ध्यास परी अंतरीं
जाहलीं मुलें लग्नाविण मग दोघिंना
अन् पळून गेली एक, तिचा ठाव ना

--:०:—

स्वयंपाक बिघडला म्हणुनी रागावला
कोणिही धजेना त्याजपुढें जायला
ओरडून केला दंगा त्यानें घरीं
ताटही स्वारिनें दिलें लोटुनी दुरी
अर्धांगीं येउनि पुसे "काय जाहलें ?"
"छे, कांहिं नसे, एरव्हीं सहज आपलें"

—:०:—

बालिका सान पांचवें साल जाहलें
कुणि तिजला डोळा मारण्यास शिकविलें
तिज काय तयाचा अर्थ बरें ठाउक !
ती करूं लागली तैसें बेलाशक
जाहली एकदां चांगलीच गंमत
पोरिनें मारिला डोळा बापाप्रत

—:o:—

खेळांत दंग तो ती चेंडू फेकुनी
किति वेळ जाहला भानावर ना कुणी
वाऱ्यानें वरतीं पदर सारखा उडे
अन् मधुन मधुन वक्षस्थळिं चेंडू पडे
तो तिला म्हणाला येउनिया गमतिस
" लागतो पहा हा चेंडु कसा चेंडुस "

—:o:—



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ६६६३

वर्गांत पुसे विद्यार्थ्यांना मास्तर
"आवडी आपआपुल्या वदा सत्वर"
बोलला एक "आवडें मला नाटक"
बोलला दुजा "मज गाण्याची बैठक"
"आवडें सिनेमा बघणें" तिसरा म्हणे
कुणि हळुच म्हणे "आवडें नटी पाहणें"

REFBK-0006663
REFBK-0006663

आजारी पडला, नर्स सुश्रुषा करी
तब्बेत तयाची मुळीं होइना बरी
अंथरूण धरुनी झाले महिने सहा
तरि म्हणे "कसेसें होतें मजला पहा"
शेवटीं समजलें, दिसलें खिडकींतुन
नर्स आणि तो–दोघांचें आलिंगन

ग्रंथ संग्रहालय ठाणे
६६६३
दा. क्र.
(३६)